

रविंद्र रामदास चौधरी



# पनामाची रोगग्रस्त झाडे जागेवरच जाळली पाहिजेत



केळी पीकावर २०१५ साला पासून पनामा रोगाचा प्रादुर्भाव काही झाडांवर दिसत होता. हळू हळू नाचनखेडा, शहापूर, खामणी, पातोंडी या गावामध्ये पनामाचे चिन्ह दिसू लागले. माझ्या शेतात मागील वर्षी २४२ झाडे झाली होती. यावर्षी कमी आहे. उत्तर प्रदेशात, नेपाळ, पाकिस्तान मध्ये रोग जास्त असल्याचे कळते. अनेक ट्रक उत्तर प्रदेश, नेपाळ आणि पाकिस्तान येथे जातात. यावर्षी अती पाऊस झाल्यामुळे व अती पाण्यामुळे आणि शेतकऱ्याने वेळेवर लक्ष देऊन औषध फवारणी न केल्यामुळे हा पनामा रोग वाढलेला आहे. जेव्हा सुरुवातीला एक दोन झाडांवरच रोग दिसतो तेव्हाच ती उपटून जाळून टाकली पाहिजेत. या सीएमव्ही रोगाची मुख्य लक्षणे म्हणजे वरची पाने पिवळी पडतात आणि झाडाचा बुंधा फाटतो. एकाच शेतात ही दोन्ही लक्षणं असू शकतात. काही ठिकाणी अगोदर बुंधा फाटणे आणि मग पाने पिवळी पडणे किंवा फक्त पाने पिवळी पडणे व बुंधा कमी फाटणे ही ही लक्षणं दिसू शकतात. अशा रोगग्रस्त झाडांना दहा ते पंधरा एमएल ग्लायकोसेट हे तणनाशक इंजेक्शनद्वारे बुंध्यात दिले जाते. म्हणजे मग नैसर्गिकरित्या झाड मारुन सुकविले जाते. त्या झाडाचे अवशेष जागेवरच जाळले जातात. नंतर तिथे लहानसा खड्डा करुन त्यात थोडा गव्हाचा भुस्सा पेटवून त्या जागेला निर्जंतूक केले जाते. याला स्टरलायझेशन असे म्हणतात. यामध्ये मुख्य हेतू रोगाचे अवशेष राहू नयेत म्हणून ते जाळले जातील आणि ती राखही जमिनीत पुरली जाते. काही शेतकऱ्यांच्या ५ हजार झाडांच्या प्लॉटमध्ये कमीत कमी १०० व जास्तीत जास्त १ हजार झाडं या पनामा रोगानं गेलेली आहेत.

जमिनीतून पसरणारा हा रोग आहे. पावसाचे पाणी एका शेतातून दुसऱ्या शेतात जाते. मजुरांच्या पायामुळे, वाहनांच्या येण्याजाण्यामुळे किंवा कुत्री व जनावरे एका शेतातून दुसऱ्या शेतात गेल्यामुळे या रोगाचा प्रसार होतो. पनामा रोग पूर्णपणे नियंत्रीत करायचा असेल तर रोगग्रस्त बागेतले कंद लागवडीसाठी वापरु नयेत. टिश्यूकल्चरची रोपे ही पूर्णपणे रोगमुक्त आणि व्हायरसमुक्त असतात. आपण जेव्हा शेतात ही टिश्यूकल्चरची रोपे लावतो तेव्हा त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचा रोग नसतो. रोपे लावल्यानंतर हे रोग येतात. म्हणजे कंपनीकडून जेव्हा टिश्यूकल्चरचे रोप पुरविले जाते तेव्हा त्यावर कोणत्याही प्रकारचा रोग नसतो. ते अत्यंत उत्तम व दर्जेदारच असते. आपण ज्या जमिनीत लागवड करणार आहे तीची गुणवत्ता आधी तपासणं गरजेचं आहे. ट्रायकोडर्मा, सोडो यासारखी जैवनाशकंही वापरणं गरजेचं आहे. रासायनिक फंगीसाईड म्हणून कार्बनडॉझिम, कॉपर ऑक्सिक्लोराईड हे ठिबक संचामधून झाडाच्या खोडाजवळ द्रावण करुन टाकायचे. जिथे पनामा हा रोग आलेला असेल तिथले कंद पुन्हा लागवडीसाठी वापरु नयेत. मजुरांची ये-जा तिथून बंद करावी. पिकांचा फेरपालट करावा. रोगयुक्त झाडाच्या भोवती नियंत्रणाकरिता चौकोनी दोरी बांधावी आणि ते क्षेत्र येण्याजाण्याकरिता बंद करावे. शेतकऱ्याने पूर्ण काळजी अगोदरपासूनच घेतली आणि वेळच्या वेळी औषधांच्या फवारण्या केल्या तर हा रोग वाढणार नाही.

**– रविंद्र रामदास चौधरी**

**मु.पो.नाचणखेडा, ता. बुऱ्हानपुर, मो.: ९००९६५६५७४**